सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ३१ जानेवारी २०१९

# सिल्लोड नगरपरिषदेसाठी २७ फेब्रुवारीला मतदान

मुंबई, दि. ३१ (रा.नि.आ.): सिल्लोड (जि. औरंगाबाद) नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २७ फेबुवारी २०१९ रोजी मतदान होणार असून त्यासाठी आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, ५ ते १२ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत नामनिर्देनपत्र स्वीकारली जातील. ९ व १० फेब्रुवारी २०१९ या शासकीय सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देनपत्रांची छाननी १३ फेब्रुवारी २०१९ रोजी होईल. मतदान २७ फेबुवारी २०१९ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० यावेळेत होईल. मतमोजणी २८ फेबुवारी २०१९ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)